15 MAR 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पखवाज वादनाची रंगली जुगलबंदी

## शाहू संगीत रजनी : दिग्गजांच्या सुरेल स्वरसाजाने गाजविला दिवस

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर , ता. १४ : पखवाज वादक कृष्णा साळुंखे (पुणे) व रोहित खवळे (पुणे) यांच्या पखवाज जुगलबंदीने रसिकांना थक्क केले. तर दिग्गज शास्त्रीय गायकांच्या सुरेल स्वरसाजाने आज रसिकांना मोहित केले. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत शास्त्र विभागातर्फे आयोजित केलेल्या शाहू संगीत रजनीत पखवाज वादन व शास्त्रीय गायनाने पहिलाच दिवस गाजवला.

येथील राम गणेश गडकरी सभागृहात सायंकाळी शाहू संगीत रजनीचे श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थित उद्घाटन झाले. पहिल्या सत्रात कृष्णा व रोहित यांचे पखवाज वादन झाले. पखवाज हे भजनी परंपरेत वापरले जाणारे वाद्य आहे. त्याची ताल शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली. विविध देवदेवतांची आराधना करताना वाजवला



जाणारा ताल रोहित यांनी सादर केला. चपळता, सहज सुलभता, कधी खट्याळ तर कधी अवखळ अशा तालात दोन्ही वादकांनी उत्तम ताकदीने पखवाज वादनाची जुगलबंदी रंगवली.

अर्थव कुलकर्णी यांनी संवादिनीची साथ तर यश मेस्त्री यांनी मंजिरा साथ केली. मनीष आपटे यांनी निवेदन केले. दुसऱ्या सत्रात 'गुणीगोविंद' शास्त्रीय संगीत सत्रात संगीताचार्य पंडित सुधीर पोटे, गौरी पाटील, गौरी कुलकर्णी यांची संगीत मैफल झाली. या संगीत रजनीचे शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे संयोजन करीत आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने राम गणेश गडकरी हॉलमध्ये राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमात गुरुवारी कृष्णा साळुंखे व रोहित खवळे (पुणे) यांची पखावज जुगलबंदी रंगली.

**महोत्सवात आज**

शुक्रवारी (ता. १५) शास्त्रीय गायिका गौतमी चिपळूणकर यांचे पहिल्या सत्रात गायन होणार आहे, तर दुसऱ्या सत्रात विदुषी अनुराधा कुबेर यांचे शास्त्रीय गायन होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
पुढारी

# पखवाजच्या जुगलबंदीने रसिकांची मने जिंकली

## शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू संगीत रजनी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पंडित सुरेश तळवळकर यांचे शिष्य कृष्णा साळुंखे व रोहित खवळे यांनी 'पखवाजरंग;' कार्यक्रमात विविध प्रकारची परन सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. संगीताचार्य पंडित सुधीर पोटे यांनी गोविंदराव टेंबे यांच्या रचनांवर आधारित रचलेली लक्षणगीते, बंदिशी, नाट्यगीते, सिनेगीतांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन शाहू महाराज, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, पंडित विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते झाले. 'पखवाजरंग' कार्यक्रमात कृष्णा साळुंखे आणि रोहित खबळे यांनी शिव परन, विष्णू परन, विठ्ठल परन सादर करून रसिकांची मने जिंकली. साळुंखे यांनी हनुमान परनचे गायन करीत पखवाजवादनाच्या सादरीकरणावर रसिकांची उत्सुकता वाढवली. त्यांना लेहरासाथ अथर्व कुलकर्णी यांनी, तर मंजिरासाथ यश मेस्त्री यांनी केली.



**कोल्हापूर : राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमात पखवाजवादन जुगलबंदी करताना कलाकार.**

हार्मोनियमवादक गोविंदराव टेंबे यांच्या रचनांवर आधारित गुणीगोविंद कार्यक्रम झाला. संगीताचार्य पंडित सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी व गौरी पाटील यांनी लक्षणगीते, बंदिशी, नाट्यगीते व सिनेगीतांचे सादरीकरण केले. 'सत्व पालनाबिना हे चंद्र मैळी' या सिनेगीताने रसिकांना डोलायला भाग पाडले. बंदिशीमध्ये 'साबन नट आणि कौशी ललता' रागाचे सादरीकरण केले. यावेळी शाल्मली जोशी, ज. ल. नागावकर, डॉ. स्नेहा राजुरीकर, नितीन मुनिश्वर, डॉ. रघुनाथ ढमकले, धैर्यशील यादव, डॉ. वैभव ढेरे, प्रशांत झंपले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

15 MAR 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अल्लादियां खां यांच्या तोडीचे गायक निर्माण होतील : शाहू छत्रपती

## राजर्षी शाहू संगीत रजनीचे उद्‌घाटन : पखवाजची जुगलबंदी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शाहू महाराजांचे दरबारी गायक अल्लादियां खां यांच्या तोडीचे गायक निर्माण होतील आणि त्यातून कोल्हापूरच्या वैभवात भर पडेल, असे प्रतिपादन शाहू छत्रपती यांनी केले.

राम गणेश गडकरी सभागृहात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीचे उद्‌घाटन शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यावेळी उपस्थित होते.

शाहू छत्रपती म्हणाले, जयपूर घराण्याचे अल्लादियां खांसारखे अनेक गायकांच्या माध्यमातून शाहू महाराजांना सामाजिक संदेश देणे सोपे जात होते. कुलगुरू शिर्के म्हणाले, गायक हवेत, त्याप्रमाणेच त्याला दाद देणारे श्रोतेही हवेत, कोल्हापुरात हे भरभरून मिळते. ही परंपरा कायम राहील. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी विभागाच्या



राम गणेश गडकरी सभागृहातील कार्यक्रमात पुण्याच्या कृष्णा साळुंके व रोहित खवळे यांची पखवाज वाद्यातून जुगलबंदी रंगली. (छाया : आदित्य वेल्हाळ)

कार्याचा आढावा घेतला. कुलगुरु शिर्के यांच्या हस्ते शाहू छत्रपती आणि शाहू छत्रपतींच्या हस्ते पं. विनोद डिग्रजकर आणि कुलगुरुंचे स्वागत केले. अतुल परीट यांनी आभार मानले. मनिष आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

पखाबजरंग सत्रात पुण्याच्या कृष्णा साळुंके आणि रोहित खवळे यांनी शिव परन, विष्णुपरन, विठ्ठल स्तुती शरण अशी जुगलबंदी सादर केली. त्यांना अथर्व कुलकर्णी यांनी साथ केली. दुसऱ्या सत्रात पं. सुधीर पोटे यांनी गायिका गौरी कुलकर्णी आणि गौरी पाटील यांच्या साथीने गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणाऱ्या गुणीगोविंद कार्यक्रमात गोविंदगीते, लक्ष्मण गीते, बंदिशी, नाट्यगीते सादर केली. सत्वपालनाविना, हे चंद्रमौळीसह राग सावनीनट, कौशी ललित, शंकरा या बंदिशी व हे माधवा, मधुसुदना आणि राम रंगी रंगला या नाट्यगीतांना रसिकांची दाद मिळाली. गिरीधर कुलकर्णी यांनी तबल्यावर, तर अमित साळोखे यांनी संवादिनीवर साथ केली.

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2024
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पखवाज वादनाने रसिक मंत्रमुग्ध

## राजर्षी शाहू संगीत रजनीचे श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

पखवाजरंग कार्यक्रमात पंडीत सुरेश तळवळकर यांचे शिष्य कृष्णा साळुंखे आणि रोहित खवळे यांनी विविध प्रकारची परन सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. तर संगीताचार्य पंडीत सुधीर पोटे यांनी कै. गोविंदराव टेंबे यांच्या रचनांवर आधारीत रचलेली लक्षण गीते, बंदिशी, नाट्यगीते, सिनेगीतांचे सादरीकरन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. कलाकारांना , रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'राजर्षी शाहू संगीत रजनी' कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमंत शाहू छत्रपती, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि पंडीत विनोद डिग्रजकर यांच्या हस्ते झाले. कलाकारांचा सत्कार राजप्रसाद धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकुरदेसाई यांनी केले. आभार



कोल्हापूर : 'राजर्षी शाहू संगीत रजनी'मध्ये पखवाज वादन करताना कृष्णा साळुंखे, रोहित खवळे.

अतुल परीट यांनी मानले. याप्रसंगी ज्येष्ठ हार्मोनिम वादक आर. एस. सबनीस व व्दारकानाथ पै यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला.

पखवाजरंग कार्यक्रमात कृष्णा साळुंखे आणि रोहित खवळे यांनी शिव परन, विष्णू परन, विठ्ठल परन सादर करून रसिकांची मने जिंकली. साळुंखे यांनी हनुमान परनचे गायन करीत पखवाज वादनाच्या सादरीकरणावर रसिकही डोलत होते. दोन्ही कलाकारांची जुगलबंदी रंगली होती. या जुगलबंदीमध्ये रसिक दंग झाले होते. त्यांना लेहरासाथ अथर्व कुलकर्णी यांनी तर मंजिरासाथ यश मेस्त्री यांनी केली.

- **संगीताचार्य पंडीत सुधीर पोटे यांच्या गायनाने रसिकांची मने जिंकली**

दुसऱ्या सत्रात कोल्हापुरातील हार्मोनियम वादक कै. गोविंदराव टेंबे यांच्या रचनांवर आधारीत 'गुणीगोविंद' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात संगीताचार्य पंडीत सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी आणि गौरी पाटील यांनी लक्षणगीते, बंदिशी, नाट्यगीते आणि सिनेगीतांचे सादरीकरण केले. 'सत्व पालनाविना हे चंद्र मैळी' या सिनेगीताने रसिकांना डोलालायला लावले. तर बंदिशीमध्ये 'सावन नट आणि कौशी ललत' रागाचे सादरीकरण केले. तसेच 'हे माधवा मधुसुदना', 'राम रंगी रंगले' या नाट्यगीताने रसिकांची मने जिंकली. गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रम रंगतदार झाला. यावेळी कला क्षेत्रातील शालमली जोशी, सुगादा काणे, ज. ल. नागावकर, डॉ. स्नेहा राजूरीकर, नितीन मुनीश्वर, डॉ. रघुनाथ ढमकले, धैर्यशील यादव, डॉ. वैभव ढेरे, प्रशांत झंपले आदी उपस्थित होते..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 MAR 2024
तरुण भारत

# कीटकविश्वाची विद्यार्थ्यांना भुरळ; प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यापीठात गर्दी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात भरवलेल्या भव्य प्रदर्शनातून कीटकांचे विश्व जाणून घेण्यासाठी परिसरातील विविध शाळांतील शिक्षक, विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. आपल्या पर्यावरणात सभोवताली असणाऱ्या सर्व प्रकारच्या कीटकांचे अनोखे विश्व समजून घेण्यासाठी विविध शाळांच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांसह उपस्थिती लावली.



बुधवारी दिवसभरात विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहिले, तर गुरुवारी सकाळपासूनच विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

येथील शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांकडून या कीटकांच्या अद्भूत विश्वाची माहिती जाणून घेतली. आपल्या अस्तित्वासाठी कीटकांचे अस्तित्व महत्त्वाचे असल्याचे या विद्यार्थ्यांच्या लक्षात आले. येथून पुढील काळात आपण कीटकांना समजून घेऊन 'जगा आणि जगू द्या' या न्यायाने त्यांची काळजी घेतली पाहिजे, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने कीटकविश्वाविषयी जागृतीचे काम केले आहे, अशा भावना शालेय शिक्षकांनी व्यक्त केल्या.

शुक्रवारीही प्रदर्शन चालू राहणार असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांनी आवर्जून या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी केले आहे.

15 MAR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पंचवीस वर्षे शोधमोहीम : घनदाट जंगलात घेतला कीटकांच्या अधिवासाचा शोध

# काही कीटक जगतात २ तास, तर काही २५ वर्षे...!

सचिन यादव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जैविक अन्नसाखळीत काही कीटकांचे आयुष्य दोन तास तर, काही कीटक १७ वर्षे जगतात. कीटकांचे जीवन, त्यांची जीवनशैली, जैविक अन्न साखळीतील महत्त्व शोधून काढत विद्यापीठातील संशोधकांनी अधिवासासोबत दोस्ती समृद्ध केली आहे. तिलारी ते चंदगडपासून जिल्ह्यातील कोनाकोपऱ्यात संशोधकांनी गोळा केलेला गेल्या २५ वर्षांच्या मेहनतीचा दुर्मीळ खजिना प्रेक्षकांच्या समोर उभा केला आहे. १५ हून अधिक संशोधक या कामात सहभागी झाले होते.



सर्वांत मोठा पतंग, भारतातील सर्वांत मोठे आणि सर्वांत लहान फुलपाखरू, तसेच ब्लू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधी मिळत आहे. रंगीबेरंगी फुलपाखरांसह टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी कीटकांच्या विविध प्रजाती व प्रकार या प्रदर्शनात मांडले आहे. मात्र, यातील प्रत्येक कीटक मिळविण्यासाठी संशोधकांनी मोठी शोध मोहीम जंगलात राबविली आहे. [illegible] जाऊन शोध मोहीम घेतली आहे. त्यासाठी स्थानिकांची आणि पर्यावरणप्रेमींची मदत घेतली आहे.





महाराष्ट्रात नव्यानेच सापडणारी लेडी बर्ड बिटल ही प्रजाती, सिकेडा नावाच्या कीटकाचे आयुष्य १७ वर्षे आहे. तोही संशोधकांनी शोधला आहे. पश्चिम घाटात मोठा पतंग शोधला आहे. मे फ्लाय प्रकारचा कीटक केवळ दोन तास जगतो.

कीटक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटक प्रदर्शनामुळे विद्यापीठाच्या [illegible] प्राणिशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे.

– डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

कीटकांच्या प्रजातींचे नमुने [illegible] विभाग आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या सहकार्याने घेतले आहेत. विभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन सुरू आहे.

– डॉ. सुनील गायकवाड, समन्वयक

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठात गर्दी

# कीटकविश्वाची विद्यार्थ्यांना भुरळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कीटक प्रदर्शनाच्या माध्यमातून किटकांचे विश्व जाणून घेण्यासाठी परिसरातील विविध शाळांतील शिक्षक, विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली आहे. आपल्या पर्यावरणात सभोवताली असणाऱ्या सर्व प्रकारच्या कीटकांचे हे अनोखे विश्व समजून घेण्यासाठी गुरुवारी विविध शाळांच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांसह हजेरी लावली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागामध्ये गुरुवारी सकाळपासूनच शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. शिक्षक आणि संशोधक विद्यार्थ्यांकडून त्यांनी या कीटकांच्या अद्भूत विश्वाची माहिती जाणून घेतली. आपल्या अस्तित्वासाठी कीटकांचे अस्तित्व महत्त्वाचे असल्याचे या विद्यार्थ्यांच्या लक्षात आले. येथून पुढील काळात आपण किटकांना समजून घेऊन जगा आणि जगू द्या या न्यायाने त्यांची काळजी घेउ, असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने कीटकविश्वाविषयी फार मोठे जागृतीचे काम केले आहे, अशी भावना शालेय शिक्षकांनी व्यक्त केल्या.



शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागामध्ये भरलेले कीटक प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली.

या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी केले आहे.

15 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू


# कीटकविश्वाची विद्यार्थ्यांना भुरळ

## शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र विभागात प्रदर्शनाला गर्दी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात भरवलेल्या कीटक प्रदर्शनाच्या माध्यमातून कीटकांचे विश्व जाणून घेण्यासाठी परिसरातील विविध शाळांतील शिक्षक, विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. पर्यावरणात सभोवतालच्या सर्व प्रकारच्या कीटकांचे अनोखे विश्व समजून घेण्यासाठी शिक्षकांसह विद्यार्थ्यांसह उपस्थिती दर्शविली.

प्राणीशास्त्र विभागात गुरुवारी सकाळपासूनच विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांकडून कीटकांच्या विश्वाची माहिती जाणून घेतली जात होती. पुढील काळात कीटकांना समजून घेऊन 'जगा आणि जगू द्या' या न्यायाने त्यांची काळजी घेतली पाहिजे, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. प्रदर्शनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने कीटकविश्वाविषयी जागृतीचे काम केले आहे, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केल्या. शुक्रवारीदेखील प्रदर्शन सुरू राहणार असून विद्यार्थी, शिक्षकांनी प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी केले आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात आयोजित कीटक प्रदर्शनात कीटकांबद्दल माहिती जाणून घेताना विद्यार्थी.**

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांनी आरोग्याकडे लक्ष द्यावे : कुलगुरू शिर्के

कोल्हापूर : प्रतिनिधी

सर्व क्षेत्रांमध्ये महिला अग्रेसर असून, त्यांचे कार्य आदर्शवत आहे. धावपळीच्या जीवनामध्ये वावरताना महिला भगिनींनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि बेटी बचाओ अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'बचत गटांकडून स्वयंसहायतेकडे' या विषयावर एकदिवसीय आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

प्रास्ताविक अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी केला. प्रमुख पाहुणे म्हणून वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वित्त विभागाच्या उपकुलसचिव प्रिया देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, सचिन कांबळे उपस्थित होते.

कार्यशाळा चार सत्रांमध्ये झाली. पहिल्या सत्रामध्ये डॉ. प्रतिभा देसाई यांनी बेटी बचाओ अभियानाबद्दल माहिती दिली.

दुसऱ्या सत्रामध्ये 'स्त्री-पुरुष समतेचे भान' या विषयावर डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये 'अंधश्रद्धा आणि स्त्रिया' या विषयावर कृष्णात स्वाती यांनी प्रात्यक्षिकांसह महिलांशी संवाद साधला.

चौथ्या सत्रात 'स्त्रियांमधील आर्थिक साक्षरता' या विषयावर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन तेजस्विनी भोसले यांनी केले.


15 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुसंवादानेच कार्यसंस्कृती विकसित होते

## प्रा. चंद्रशेखर फडणीस : 'केआयटी'त शिवाजीराव देसाई व्याख्यानमाला



कोल्हापूर : केआयटीतील व्याख्यानमालेत 'कार्यसंस्कृती' विषयावर मार्गदर्शन करताना मुख्य वक्ते चंद्रशेखर फडणीस. डावीकडून संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, संस्थाध्यक्ष सुनील कुलकर्णी व शशिताई देसाई.

सकाळ वृत्तसेवा

कंदलगाव, ता. १४ : हे कार्य माझे आहे, हा सकारात्मक भाव व त्याला सोबत सहकाऱ्यांशी, विद्यार्थ्यांशी आपलेपणाची भावना ही शिक्षण संस्थेत खरी संस्कृती घडवते. याच सुसंवादाने कार्यसंस्कृती विकसित होते, असे मत आजरा सूत गिरणीचे माजी कार्यकारी संचालक चंद्रशेखर फडणीस यांनी व्यक्त केले.

ते शिवाजी विद्यापीठ व केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योगभूषण कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत कार्यसंस्कृती यशस्वी संस्थेचा पाया विषयावर बोलत होते. फडणीस म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या व स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी सभोवतालची कार्यसंस्कृती पोषक बनवणे, हे घटकांचे आद्य कर्तव्य आहे.' कार्यसंस्कृतीचे महत्त्व, कार्यसंस्कृतीचे पैलू, कार्यसंस्कृतीची उदाहरणे देत मार्गदर्शन केले.' अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. केआयटीचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी व उद्योगभूषण कै. शिवाजीराव देसाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा शशिताई देसाई या प्रमुख उपस्थित होत्या.

अध्यक्ष डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, 'नवनिर्मिती, संशोधनातील सकारात्मक कार्यसंस्कृतीने शाश्वत विकासाची कास धरत विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करू शकतो; असा विश्वास व्यक्त केला. नवीन शैक्षणिक धोरण भविष्यात भारताचे परावलंबित्व कमी करून स्वतःच्या पायावर व्यक्तीला, समाजाला व देशाला उभे करण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात डॉ. मोहन वनरोट्टी यांनी स्थानिक उद्योग क्षेत्राच्या सर्वस्पर्शी वृद्धी व विकासासाठी कै. शिवाजीराव देसाई यांनी पाया रचलेल्या केआयटीची या व्याख्यानमाची भूमिका विशद केली. संस्थाध्यक्ष सुनील कुलकर्णी यांनी कै. शिवाजीराव देसाई यांच्या कर्तृत्वाला व आठवणींना उजाळा दिला.

वक्त्यांचा सत्कार प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याहस्ते झाला. अध्यक्ष व प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांचा सत्कार अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांच्याहस्ते झाला. मुख्य अतिथींचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. दीप्ती कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा. अमर टिकोळे यांनी मानले. कार्यक्रमास रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. नियोजनात प्रा. प्रियांका माने, किरणकुमार पाटील, स्वप्नील मोहिते, निखिल सौंदत्तीकर, अमित वैद्य, ऋतुपर्ण करकरे, नितेश कदम, संतोष पोतदार यांचे सहकार्य लाभले.

15 MAR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुसंवादातूनच 'कार्यसंस्कृती' विकसित होते : प्रा. फडणीस

## शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर : प्रतिनिधी

हे कार्य माझे आहे, हा सकारात्मक भाव व त्याला सोबत सर्व सहकाऱ्यांशी; विद्यार्थ्यांशी आपलेपणाची भावना शिक्षण संस्थेमध्ये खरी संस्कृती घडवत असते. विद्यार्थ्यांच्या व स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी सभोवतालची कार्यसंस्कृती पोषक बनवणे हे त्या महाविद्यालयातील सर्व घटकांचे आद्य कर्तव्य आहे, असे उद्‌गार आजरा सूतगिरणीचे माजी कार्यकारी संचालक चंद्रशेखर फडणीस यांनी काढले. शिवाजी विद्यापीठ व केआयटी कॉलेज यांच्या संयुक्त



कोल्हापूर : केआयटी येथे झालेल्या शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेमध्ये बोलताना चंद्रशेखर फडणीस.

विद्यमाने उद्योगभूषण शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी 'कार्यसंस्कृती : यशस्वी संस्थेचा पाया' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. प्रमोद एस. पाटील होते.

प्रास्ताविक संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांनी शिवाजीराव देसाई यांच्या कर्तृत्वाला व आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन डॉ. दीप्ती कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा. अमर टिकोळे यांनी मानले. रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या नियोजनात प्रा. प्रियांका माने, प्रा. किरणकुमार पाटील, प्रा. स्वप्नील मोहिते, प्रा. निखिल सौंदत्तीकर, प्रा. अमित वैद्य, प्रा. ऋतुपर्ण करकरे, नीतेश कदम, संतोष पोतदार यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
तरुण भारत


# बहुविद्याशाखेतून कौशल्यपूर्ण युवा पिढी घडण्याची गरज

वार्ताहर
मुरगूड

वेगाने बदलण्र्या जागतीक परिस्थितीमध्ये बहुविद्याशाखीय कौशल्यप्राप्त युवापिढी निर्माण होण्याची गरज शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ पी. एस. पाटील यांनी प्रतिपादन केली.

मंडलिक महाविद्यालयात बहुविद्याशाखीय राष्ट्रिय परिषदेत ते बिजभाषण देताना बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ अर्जुन कुंभार होते. जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह आण्णासाहेब थोरवत, दूधसाखर महाविद्यालय बिद्रीचे प्राचार्य डॉ. संजय पाटील, देवचंद कॉलेज अर्जुननगरच्या प्राचार्या डॉ. इंगळे प्रमुख उपस्थित होते .

यावेळी माजी प्राचार्य डॉ. जयंत कळके यांनी नविन शैक्षणिक धोरणसाठी अभ्यासपूर्ण अमलबजावणीची गरज व्यक्त केली. प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार



■ प्र कुलगुरू डॉ पी एस पाटील

यांनी महाविद्यालयातील बहुविद्याशाखीय परिषद जून २०२५ पासून अमलबजावणी होत असलेल्या नविन शैक्षणिक धोरणासाठी दिशादर्शक असल्याचा विश्वास व्यक्त केला.

परिषदेच्या संयोजक प्रा. डॉ. सौ. माणिक पाटील यांनी स्वागत केले. प्रा डॉ उदय शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा विनोद प्रधान यांनी केले. प्रा. डॉ. शिवाजी होडगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024

पुण्यनगरी


# 'आयडियाथॉन' स्पर्धेत 'डीवायपी टेक्नि.' अव्वल

## प्रा. आरिफ शेख यांचे सिमेन थावर युनिट प्रथम | अँटी-रोड संमोहन कॅपलाही तिसरे स्थान

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या आयडियाथॉन स्पर्धेमध्ये तळसंदे येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरने जनावरांमधील कृत्रिम रेतनसाठी तयार केलेल्या उपकरणाने अव्वल स्थान पटकावले आहे. याबाबतच्या पुढील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून सीड फंडिंग केले जाणार आहे.

डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे हेड प्राध्यापक आरिफ शेख यांच्या सिमेन थावर युनिटला या स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर अँटी रोड हिप्नॉयसिस कॅप (शिव कवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरवण्यात आले. या संशोधनासाठी सहायक म्हणून



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडून प्रथम क्रमांकाचा सन्मान स्वीकारताना प्रा. आरिफ शेख व विद्यार्थी.

कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षाच्या साक्षी मेनकर, निहाल शेख व ललित टेकाळे यांचा सहभाग होता.

प्रथम क्रमांक मिळालेल्या संशोधनाचा विषय हा ॲनिमल हसबंडरी डिपार्टमेंट (महाराष्ट्र शासन)कडून आलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर होता. जनावरांमध्ये कृत्रिम रेतन प्रक्रियेमध्ये विशेषतः गाय व म्हैस माजावर असताना (हिट पिरियड) सिमेनची गुणवत्ता, त्याचे तापमान हे योग्य असणे गरजेचे आहे. ही गुणवत्ता योग्य राहावी यासाठी प्रा. शेख यांनी शेतकऱ्यांना परवडेल, असे भारतीय बनावटीचे उपकरण तयार केले.

याच स्पर्धेत प्रा. शेख यांनी तयार केलेल्या अँटी-रोड संमोहन कॅप ( शिवकवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरवण्यात आले. रस्त्यावरून वाहन चालवताना विशेषतः समृद्धी महामार्गसारख्या मेगा हायवेवर ड्राईव्ह करत असताना रोड हिप्नोसेसला बळी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा परिस्थितीत शिवकवच अतिशय परिणामकारक ठरणार आहे.

या रिसर्च प्रोजेक्टसाठी टेक्निकल कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. सतीश पावसकर यांचे मार्गदर्शन व शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक आ. एस. पवार, डॉ. विशाल सूर्यवंशी व विभागप्रमुख प्रा. उमेश पाटील यांचे सहकार्य लाभले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज ऊर्फ बंटी डी पाटील, विश्वस्त आ. ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी या यशाबद्दल सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 MAR 2024

तरुण भारत

# 'आयडियाथॉन' मध्ये डी. वाय. पाटील रिसर्च सेंटर अव्वल

- प्रा. आरिफ शेख यांचे सिमेंन थावर युनिट प्रथम
- अँटी–रोड संमोहन कॅपलाही तिसरे स्थान

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या आयडियाथॉन स्पर्धेमध्ये तळसंदे येथील डी. वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस रिसर्च सेंटरने जनावरामधील कृत्रिम रेतनासाठी तयार केलेल्या उपकरणाने अव्वल स्थान पटकावले आहे. याबाबतच्या पुढील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून सीड फंडिंग केले जाणार आहे.

प्रा. आरिफ शेख यांच्या सिमेंन थावर युनिटला या स्पर्धेत प्रथम क्रमांक तर अँटी रोड हिप्नॉयसिस कॅप (शिव कवच) या संशोधनाला तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले. या संशोधनासाठी सहाय्यक म्हणून कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षाच्या साक्षी मेनकर, निहाल शेख व ललित टेकाळे यांचा सहभाग होता.



कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडून प्रथम क्रमांकाचा सन्मान स्वीकारताना प्रा. आरिफ शेख व विद्यार्थी.

जनावरांमध्ये कृत्रिम रेतन प्रक्रियेमध्ये विशेषत: गाय व म्हैस माजावर असताना (हिट पिरियड) सिमेनची गुणवत्ता, त्याचे तापमान हे योग्य असणे गरजेचे आहे. ही गुणवत्ता योग्य राहावी यासाठी प्रा. शेख यांनी अनेक महिने काम करून सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडेल असे संपूर्ण भारतीय बनावटीचे उपकरण तयार केले.

तसेच प्रा. शेख यांनी तयार केलेले अँटी–रोड संमोहन कॅप ( शिवकवच) हे उपकरण संपूर्णपणे स्वयंचलित असून चालकाला झोप येऊ देत नाही. जरी चालक झोपेच्या अधीन होत असेल तर त्याला पुर्णपणे जागा करण्याचे काम अँटी–रोड संमोहन कॅप करते. डॉ. सतीश पावसकर यांचे मार्गदर्शन व प्रा.आ. एस. पवार, डॉ. विशाल सूर्यवंशी प्रा. उमेश पाटील सर यांचे सहकार्य लाभले.

अध्यक्ष डॉ संजय डी. पाटील, आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ ए के गुप्ता यांनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
तरुण भारत

# विद्यापीठात सुरू होणार बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रथमच बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू होत आहे. चित्रपटांशी संबंधित असलेला कॅम्पसमधील हा पहिलाच अभ्यासक्रम असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी पुढाकार घेऊन चालू शैक्षणिक वर्षापासून चित्रपटविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. बारावी पास असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. अत्यंत कमी शुल्कात विद्यार्थ्यांना पूर्णवेळ अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. वसतिगृहाची सुविधा मिळणार आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

15 MAR 2024 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बारावीनंतर फिल्म मेकिंग कोर्स!

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रथमच बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू होत आहे. चित्रपटांशी संबंधित असलेला कॅम्पसमधील हा पहिलाच अभ्यासक्रम असून, नवीन शैक्षणिक धोरणानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होत आहे.

चित्रपट विषयाचे शास्त्रीय प्रशिक्षण कोल्हापुरात आतापर्यंत उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या पुढाकाराने चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात चित्रपटविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार हा अभ्यासक्रम तयार झाला असून लवकरच त्याची अंमलबजावणी होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य होणार आहे.

बारावी पास विद्यार्थ्याला कमी शुल्कात या पूर्णवेळ अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार याची रचना केली असून थेअरी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित हा अभ्यासक्रम आहे. चित्रपट जगताशी संबंधित तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे. वसतिगृहाची सुविधाही मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी मास कम्युनिकेशन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

15 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बारावीनंतर फिल्म मेकिंग कोर्स!

## येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी; पहिलाच अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात प्रथमच बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू होणार आहे. चित्रपटांशी संबंधित असलेला हा पहिलाच अभ्यासक्रम आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होणार आहे.

कोल्हापूरला चित्रपट क्षेत्राचा मोठा वारसा आहे. तथापि, चित्रपट विषयाचे शास्त्रीय प्रशिक्षण आतापर्यंत उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईला जावे लागत होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांनी पुढाकार घेऊन चालू शैक्षणिक वर्षापासून चित्रपटविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसोबत बाहेरील विद्यार्थ्यांना चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य होणार आहे. अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

### नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची रचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. थेअरी व प्रात्यक्षिकांवर आधारित हा अभ्यासक्रम असणार आहे. चित्रपट जगताशी संबंधित तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. कमी शुल्कात विद्यार्थ्यांना पूर्णवेळ अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. नियमानुसार वसतिगृहाची सुविधा मिळणार आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
सकाळ

# सौरऊर्जेबाबतच्या उपकरणाला पेटंट

## डॉ. भोसले, माने, खोत यांची कामगिरी


डॉ. पी. एन. भोसले


डॉ. राहुल माने


डॉ. किशोरकुमार खोत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील संशोधक प्रा. डॉ. पी. एन. भोसले, डॉ. राहुल माने, डॉ. किशोरकुमार खोत यांनी सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या निर्मितीचे उपकरण (अरेस्टेट प्रेसिपिटेशन टेक्निक) तयार केले. त्याला आज भारत सरकारचे पेटंट जाहीर झाले. या संशोधकांनी केंद्र सरकारच्या पेटंट प्रमाणपत्र कार्यालयात पेटंट मिळवण्याबाबत अर्ज केला होता. चौदा महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर पेटंट मंजूर झाले आहे.

डॉ. भोसले सध्या यूजीसी बीएसआर फॅकल्टी फेलो म्हणून कार्यरत आहेत. डॉ. खोत स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अप्लाइड केमिस्ट्रीमधून एमएस्सी पूर्ण केली आहे. डॉ. माने हे औद्योगिक रसायनशास्त्र विभागात गेली बारा वर्षे सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. आत्तापर्यंत त्यांचे ७५ हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांनी सोलर एनर्जीवर संशोधन केले आहे. भारत सरकारचा यंग सायंटिस्ट पुरस्कारदेखील प्राप्त झाला आहे. या संशोधकांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्राचे विभागप्रमुख के. डी. सोनवणे, औद्योगिक रसायनशास्त्राचे समन्वयक डॉ. गजानन राशीनकर यांचे मार्गदर्शन लाभले.



### सौरऊर्जेच्या रूपांतरासाठी उपयुक्त

या नावीन्यपूर्ण उपकरणापासून अनेक नवनवीन पदार्थांची यशस्वीरित्या निर्मिती करून त्याचा वापर विविध स्मार्ट, इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक संशोधकीय विषयांमध्ये केला जात असल्याचे डॉ. माने यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या तीन प्राध्यापकांना मिळाले सोलर संशोधनाचे पेटंट

## सौर ऊर्जा निर्माण करणारे उपकरण : नावलौकिकांत भर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सोलर संशोधन क्षेत्रात केलेल्या 'अरेटेस्ड प्रेसिपीटीशन टेक्निक (एपीटी) या उपकरणाला भारत सरकारचे पेटंट मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या तीन प्राध्यापकांनी पेटंटसाठी नामांकन दाखल केले होते. स्कूल ऑफ नॅनो सायन्समधील सहायक प्रा. किशोरकुमार खोत, औद्योगिक रसायनशास्त्र विभागातील सहायक प्रा. राहुल माने आणि सध्या



पी. एन. भोसले



राहुल माने



किशोरकुमार खोत

यूजीसीच्या बीएसआर विभागाकडे असलेले प्रो. डॉ. पी. एन. भोसले यांनी या उपकरणाची निर्मिती केली आहे.

या पेटंटसाठी २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी नामांकन दाखल केले होते. त्यांना गुरुवारी पेटंट मिळाल्याचे प्रमाणपत्र मिळाले. कमीत कमी खर्चात सोलरची उपकरणे तयार होऊ शकतात. त्यासाठी ९० पानांचा शोधनिबंध सादर केला आहे.

सध्याची सोलर सिस्टीम तयार करण्यासाठी अनेक प्रकारची छोटी उपकरणे लागतात. त्यासाठी अतिशय कमी खर्चात या उपकरणाची निर्मिती होऊ शकते. सध्या वीज बिलाच्या कटकटीपासून मुक्त होण्यासाठी अनेकजण सोलर ऊर्जेचा वापर करतात. ही सोलरची उपकरणे कमी खर्चात तयार होऊ शकतात, असा त्यांचा दावा आहे. कमी तापमान, अत्यल्प रसायनांचा व उपकरणाचा खर्च, सुलभ हाताळणी हे या उपकरणाचे वैशिष्ट्य आहे.

15 MAR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. राहुल माने यांच्या 'अरेस्टेट पेसिपिटेशन टेक्निक' ला पेटंट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील संशोधकांच्या सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या निर्मितीचे उपकरण म्हणजेच 'अरेस्टेट प्रेसिपिटेशन टेक्निक" या उपकरणास भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारत सरकारच्या पेटंट प्रमाणपत्र कार्यालयात "अरेस्टेट प्रेसिपिटेशन टेक्निक उपकरण" ला पेटंट मिळवण्याबाबत अर्ज सादर केला होता. अवघ्या १४ महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १४ मार्च २०२४ रोजी हे पेटंट मंजूर झाले आहे. या नाविन्यपूर्ण उपकरणापासून अनेक नवनवीन पदार्थांची यशवीरित्या निर्मिती करून, त्याचा वापर विविध स्मार्ट, इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक संशोधकीय विषयांमध्ये केला जात आहे. या उपकरणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कमी तापमान, अत्यल्प रसायनांचा व उपकरण्याचा खर्च, सुलभ हाताळणीमुळे हे उपकरण नवतरुण संशोधकांना उपयोगी ठरणार आहे. सध्याच्या काळात इंधनाची गरज वाढत असून, किंमतीत वाढ होत आहे. त्यामुळे संशोधकांनी सौर ऊर्जेचे रूपांतर व नवनवीन पदार्थांची निर्मिती करण्यासाठी या उपकरणाचा वापर करण्यात येत आहे. या संशोधनामध्ये संशोधक प्रा. डॉ पी. एन. भोसले, डॉ राहुल माने, डॉ किशोरकुमार खोत यांनी महत्वाचे योगदान दिले आहे.



शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. पी. एन. भोसले निवृत्त प्रा. असून, सध्या यूजीसी बीएसआर फॅकल्टी फेलो म्हणून कार्यरत आहेत. प्रा. डॉ. किशोर कुमार खोत हे स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. खोत इंगळी गावातील असून अप्लाइड केमिस्ट्रीमधून एमएस्सी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना डीएसटी इन्स्पायर शिष्यवृत्ती संशोधन काळात मिळाली आहे. शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील डॉ. माने हे औद्योगिक रसायनशास्त्र विभागात गेल्या बारा वर्षांपासून सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आत्तापर्यंत त्यांचे ७५ हुन अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांचे सोलार एनर्जीवरती संशोधन कार्य असून, या विषयावर त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ते ३० हून अधिक जर्नलचे परीक्षक म्हणून काम पाहत आहेत. तसेच वीसहून अधिक जर्नलच्या सदस्य, असोसिएट एडिटरपदी कार्यरत आहे. त्यांनी दोन संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यांना डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी भारत सरकारचा यंग सायंटिस्ट पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. जगातील पंधराहून अधिक विज्ञान सोसायटीच्या मंडळावर सदस्य आहेत. २५ हून अधिक आंतरराष्ट्रीय परिषदेच्या सल्लागार पदावर काम केले आहे. संशोधन व टीचिंगसोबत सामाजिक कार्यात त्यांचे योगदान राहिले आहे. नुकताच त्यांना रोटरी क्लब जिल्हा पुरस्कार देखिल प्राप्त झाला आहे.

15 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासाबरोबरच खेळांतही प्रावीण्य मिळवा

## प्रा. डॉ. सोनकवडे; भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठात सत्कार

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : 'विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास, संशोधनाबरोबरच खेळांमध्येही प्रावीण्य मिळवावे,' असे प्रतिपादन भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले. त्यांच्या हस्ते शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात पारितोषिक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी बुद्धिबळ, बॅडमिंटन, क्रिकेट, कबड्डी, रस्सीखेच, मॅरेथॉन, ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारांत चांगली कामगिरी केली.



कोल्हापूर : विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक मिळवणाऱ्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचा विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत प्रावीण्य मिळविले. यामध्ये आदिती गुरव (एम. एस्सी. भाग १) या विद्यार्थिनीस १०० मीटर धावणेमध्ये द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) व उंचउडीमध्ये तृतीय क्रमांक (कांस्य पदक), ४०० मी. रिलेमध्ये प्रणोती यादव, उत्कर्षा माळी, जयश्री बच्चे, संपदा चव्हाण यांना तृतीय क्रमांक (कास्य पदक), जयश्री बच्चे (एम. एस्सी. भाग २) लांब उडीमध्ये सुवर्णपदक, तसेच मिनी मॅरेथॉनमध्ये कर्मचारी गटामध्ये डॉ. एस. एस. पाटील (२ क्रमांक) आणि डॉ. एन. एल. तरवाळ (६ वा क्रमांक). महिला गटामध्ये ऋतुजा पाटील (५ वा क्रमांक) आणि तेजश्री पाटील (६ वा क्रमांक) यांना पारितोषिक मिळाले.

तसेच अधिविभागाने सादर केलेल्या 'विविधतेतून एकता' या विषयावरील संचलनास प्रथम क्रमांकाचे (सुवर्णपदक) पारितोषिक मिळाले. प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. यू. एम. चौगुले, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. व्ही. एस. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ. एस. एस. पाटील यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'शिवस्पंदन' वार्षिक क्रीडा महोत्सवातील पारितोषिके मिळवलेले भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी.

# भौतिकशास्त्र विभाग शिक्षणासोबतच अभ्यासेतर उपक्रमांत आघाडीवर : प्रा. आर. जी. सोनकवडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भौतिकशास्त्र अधिविभाग शिक्षणासोबतच अभ्यासेतर उपक्रमात आघाडीवर आहे, असे प्रतिपादन भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे 'शिवस्पंदन' वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये यश मिळवले. आदिती गुरव हिने १०० मीटर धावणेत रौप्य पदक व उंचउडी मध्ये कांस्य पदक मिळवले. ४०० मी. रिले मध्ये प्रणोती यादव, उत्कर्षा माळी, जयश्री बच्चे, संपदा चव्हाण यांना तृतीय क्रमांक (कांस्य पदक) मिळवला. जयश्री बच्चे (एम. एस्सी. भाग २) हिने लांबउडीत सुवर्णपदक मिळवले. विविधतेतून एकता विषयावरील संचलनास प्रथम क्रमांकाचे (सुवर्णपदक) पारितोषिक मिळाले. प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. यु. एम. चौगुले, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. व्ही. एस. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. एस. एस. पाटील यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

15 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मूट कोर्टमुळे कायद्याचा सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत

## न्या. शिवाजी साळुंखे; विद्यापीठात मूट कोर्ट स्पर्धा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, कोर्टात युक्तिवाद कसा करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव मूट कोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळतो. यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मोलाची मदत मिळते. सध्याच्या काळात अशा उपक्रमाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा न्या. शिवाजी साळुंखे यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने मूट कोर्ट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हा न्या. शिवाजी साळुंखे. सोबत मान्यवर.

शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा न्या. अपर्णा वाईकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी न्या. साळुंखे म्हणाले, कायद्याची पदवी घेतल्यानंतर सक्षम होण्यासाठी मूट कोर्ट स्पर्धा उपक्रमात सहभाग घेणे महत्त्वाचे आहे.

न्या. वाईकर म्हणाल्या, विधी पदवीधर व युवा वकिलांनी आयुष्यात यशस्वी वकील व्हायचे असल्यास कायद्याच्या ज्ञानाबरोबरच सभोवतालच्या घडामोडीकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान बाळगणे गरजेचे आहे.

यावेळी न्या. व्ही. पी. गायकवाड, एस. ए. बाफना, के. आर. सिंघेल, पी. आर. राणे, एस. बी. ढेवरे, पी. एल. गुप्ता, ज्येष्ठविधिज्ञ गिरीश नाईक, माधव आचार्य यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विधी विभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन आर. नारायण यांनी केले. यावेळी अॅड. प्रमोद दाभाडे, रोहिदास भांगरे, गौरव जवळकर, महेंद्र चव्हाण, कार्तिकी कुलकर्णी, देवदास चौगुले, जयदीप कदम, नागेश दरेकर, आश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान, राष्ट्रीय स्तरावरील मूट कोर्ट व वाद-विवाद निवारण स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठासह नऊ महाविद्यालयांनी भाग घेतला. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.

एल. एल. बी. मूट कोर्ट विजेते : व्ही. एम. साळगावर, कॉलेज ऑफ लॉ पणजी, गोवा. उपविजेते : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. एल. एल. एम. मूट कोर्ट विजेते : डिपार्टमेंट ऑफ लॉ, शिवाजी विद्यापीठ. उपविजेते : इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा. मेडिएशन रोल प्ले विजेते : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. उपविजेते : डिपार्टमेंट ऑफ लॉ, शिवाजी विद्यापीठ. बेस्ट रिसर्चर एल. एल. बी. मूट कोर्ट : नेहा एस. पोंबुर्फेकर, व्ही, एम, साळगावकर कॉलेज ऑफ लॉ. गोवा. बेस्ट रिसर्चर एल. एल. एम. मूट कोर्ट : प्रियांका वसंतराव निकम, इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, कोल्हापूर. बेस्ट मूटर एल. एल. बी. मूट कोर्ट : माहेश्वरी डी. गुंडेवाडी, शहाजी लॉ, कॉलेज, कोल्हापूर. बेस्ट मेडिएटर : साईष्णू सुयोग पंडित, व्हिक्टर डान्टस लॉ कॉलेज, कुडाळ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
लोकमत

# प्रतिरूप न्यायालयामुळे कायद्याचा सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत : साळुंखे

## 'मुटकोर्ट' स्पर्धेत विद्यापीठासह नऊ महाविद्यालयांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून न्यायालयात युक्तिवाद कसा करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव प्रतिरुप न्यायालयाद्वारे (मुटकोर्ट) विद्यार्थ्यांना मिळतो, यातून सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मोलाची मदत मिळते. सध्याच्या काळात अशा उपक्रमाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश एस.आर. साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाने आयोजित केलेल्या नवव्या राष्ट्रीय मुटकोर्ट आणि वाद विवाद निवारण स्पर्धेचे उद्‌घाटन गुरुवारी जिल्हा न्यायाधीश साळुंखे आणि अपर्णा वाईकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून साळुंखे बोलत होते. अपर्णा वाईकर म्हणाल्या, विधी पदवीधर आणि युवा वकिलांनी कायद्याच्या ज्ञानाबरोबरच सभोवतालच्या घडामोडींकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान बाळगणे गरजेचे आहे. यावेळी विधी अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांच्या 'इंडियन कॉन्स्टिट्यूनल लॉ : द न्यू चॅलेन्जेस' या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.

### साळगांवकर कॉलेज ठरला विजेता

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठासह नऊ महाविद्यालयांनी भाग घेतला. विजेते पुढीलप्रमाणे : एल. एल. बी. : व्ही. एम. साळगांवर कॉलेज ऑफ लॉ पणजी. उपविजेते : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. एल. एल. एम. : डिपार्टमेंट ऑफ लॉ, शिवाजी विद्यापीठ. उपविजेते : ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा. मेडिएशन रोल प्ले विजेते : शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर. उपविजेते : डिपार्टमेंट ऑफ लॉ, शिवाजी विद्यापीठ. बेस्ट रिसर्चर एल. एल. बी. मुटकोर्ट : नेहा पोंबुर्फेकर, व्ही, एम, साळगांवकर कॉलेज ऑफ लॉ. गोवा. बेस्ट रिसर्चर एल. एल. एम. मुटकोर्ट : प्रियांका वसंतराव निकम, ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, कोल्हापूर. बेस्ट मूटर एल. एल. बी. मुटकोर्ट : माहेश्वरी गुंडेवाडी, शहाजी लॉ, कॉलेज, कोल्हापूर. बेस्ट मेडिएटर : साईष्णू सुयोग पंडित, व्हिक्टर डान्टस लॉ कॉलेज, कुडाळ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2024
पुण्यनगरी

# कबीर हा गूढ, भक्तिवादी कवी : डॉ. गवळी

कोल्हापूर : कबीर यांच्या कवितेमधून जीवनाविषयी भाष्य पाहायला मिळते. कबीर हा गूढ आणि भक्तिवादी कवी आहे, असे प्रतिपादन डॉ. अनिल गवळी यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन आयोजित श्री रघुनाथ स्वामी आनंदमूर्ती व्याख्यानमालेतील 'कबीर : माणूस आणि कवी' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. त्यांनी तुकाराम आणि कबीर यांच्या कवितेतील साम्यस्थळांचीही मांडणी केली. अध्यक्षस्थानी डॉ. रणधीर शिंदे होते. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी डॉ. गोमटेश्वर पाटील, प्रा. संतोष बाबर आदी उपस्थित होते.

लोकमत

# इनोव्हेशन, स्पर्धेत ७४ जणांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य केंद्राच्या वतीने इनोव्हेशन, उद्योजकता आणि स्टार्टअप्स यांचे भित्तीचित्र प्रदर्शन आणि मॉडेल सादरीकरण यांची स्पर्धा झाली. स्पर्धेत ७४ जणांनी सहभाग नोंदविला.

या प्रदर्शन व स्पर्धेमध्ये ७४ पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसह संशोधक आणि नवउद्योजक सहभागी झाले. त्यांनी आपले संशोधन, उद्योग संकल्पना आणि उत्पादने यांचे सादरीकरण केले. स्पर्धेत शाश्वत विकासाबाबत पर्यावरणीय संकल्पना, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणे, फौंड्रीतील टाकाऊ वाळूपासून विटांची निर्मिती व रस्त्याकरिता पुनर्वापर, पौष्टिक खाद्यपदार्थ निर्मिती पद्धती, आदी संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2024 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Open to granting autonomous status to more universities: UGC chairman

Komal.Sharma
@timesgroup.com

**New Delhi:** University Grants Commission has said it is anticipating more universities into graded autonomy system that will give them different degrees of freedom in academic and administrative decision-making.

Speaking to **TOI**, UGC chairman **Mamidala Jagadesh Kumar** explained why graded autonomy system is effective, saying this enables universities to restructure existing courses and introduce new ones.

Last week, UGC had granted autonomy to eight central universities in India, including Delhi University.

"Universities, inherently autonomous in their establishment regardless of type, can restructure existing courses and introduce new ones aligned with local, national, and international demands," Kumar said.



On how graded autonomy is provided, he said, "Universities can apply to UGC twice a year," adding that the commission then reviews applications and publishes categorisation decisions within 30 days.

In 2018, UGC had introduced norms for granting graded autonomy to universities. As per that, universities are classified into Category I, II, and III based on predefined parameters.

"Goal for autonomous universities is ensuring equal access for all students, irrespective of their background and socioeconomic status. This commitment to inclusivity aligns with the broader vision of fostering a diverse and dynamic learning environment," the chairman said.

"These institutions should actively work towards creating a supportive atmosphere that encourages innovation, research, and overall academic growth. Success of graded autonomy model hinges on universities embracing these principles and continually striving for educational excellence," Kumar added.

Kumar said UGC believes that autonomous universities will play a pivotal role in shaping future of Indian education in multifaceted ways. Endowed with freedom to design curricula and experiment with teaching methods, these universities can pioneer and follow best practices, fostering innovative and student-centric learning.

Over 60 HEIs were granted autonomous status in 2018. Some of them are reputed centers of learning such as JNU, AMU and BHU. "Success of autonomous universities serve as inspiration, motivating other higher educational institutions to adopt similar practices," he added.